मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# डी वाय पाटील कॉलेज 'आरडीएक्स'ने उडवण्याची धमकी!

## एका मेलने उडाली खळबळ : पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून सुरक्षा सतर्कता

**पिंपरी | प्रतिनिधी**

आकुर्डी येथील डी वाय पाटील कॉलेज परिसरात आरडीएक्स विस्फोटक पेरले असून परिसरात मोठा स्फोट घडवून आणला जाणार असल्याचा मेल महाविद्यालय प्रशासनाला प्राप्त झाला. त्यानंतर पिंपरी-चिंचवड पोलिसांची आणि कॉलेज प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली.

आकुर्डी येथे डॉ. डी वाय पाटील संस्थेचे मोठे कॅम्पस आहे. या कॅम्पस मध्ये हजारो विद्यार्थी वेगवेगळ्या शाखांमध्ये शिक्षण घेत आहेत. मंगळवारी (११ मार्च) कॉलेज मध्ये परीक्षा सुरु असताना अचानक प्रशासनाला सकाळी नऊ वाजता एक मेल प्राप्त झाला. त्यामध्ये डी वाय पाटील कॅम्पसमध्ये आरडीएक्स नावाचे विस्फोटक पेरले असून त्याद्वारे कॉलेज उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती.



डी वाय पाटील कॉलेज प्रशासनाकडून तब्बल तीन तासानंतर दुपारी १२ वाजता पिंपरी-चिंचवड पोलिसांना मेलबाबत माहिती देण्यात आली. माहिती मिळताच रावेत पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. अचानक पोलिसांचा मोठा ताफा कॉलेजमध्ये पोहोचल्याने विद्यार्थी आणि प्राध्यापकांमध्ये घबराट पसरली. पोलिसांनी तत्काळ संपूर्ण कॉलेज रिकामे करण्याचे आदेश दिले आणि सर्व विद्यार्थ्यांना बाहेर काढून तपासणी सुरू केली. परिसरात तपासणी सुरू असताना अफवांना उधाण आले. त्यामुळे पालकांनीही घाईघाईने कॉलेजकडे धाव घेतली. दरम्यान बॉम्ब शोधक नाशक पथक, श्वान पथक, सायबर पोलीस आणि गुन्हे शाखेच्या पोलिसांना पाचारण करण्यात आले.

आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी सुरुवातीला परीक्षा सुरु असलेल्या ठिकाणचा परिसर पिंजून काढला. तिथे कुठेही विस्फोटक आढळले नाही. त्यानंतर पोलिसांनी संपूर्ण कॅम्पस मध्ये शोधमोहीम राबवली. विस्फोटक नसल्याची खात्री झाल्यानंतर या मेलबाबत तांत्रिक माहिती काढण्यास पोलिसांनी सुरुवात केली आहे. सायबर पोलिसांकडून मेल पाठवणाऱ्या व्यक्तीची ओळख पटवण्याचे काम सुरु आहे.

### पोलिसांचा 5 ते 6 तास कसून तपास

» बॉम्ब शोध पथक आणि सायबर सेलच्या मदतीने संपूर्ण कॉलेज परिसराची तपासणी करण्यात आली. तपासादरम्यान कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. तब्बल पाच ते सहा तास शोध घेतल्यानंतर हा ई-मेल खोटा असल्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन फटांगरे यांनी जाहीर केले.

# कालवा समितीत डावलले; जलसंपदा मंत्र्यांनी सावरले!

## अतिरिक्त जलस्त्रोत : पिंपरी-चिंचवडला मुळशी धरणातून पाणी आरक्षणाचा प्रस्ताव

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी याचा विचार करता नवीन जलस्त्रोत निर्मिती ही काळाची गरज आहे. त्यासाठी मुळशी धरणातून 760 एमएलडी पाणी आरक्षण मिळावे, असा प्रस्ताव महानगरपालिका प्रशासनाने जलसंपदा विभाग आणि राज्य सरकारच्या नगरविकास विभागाला पाठवला आहे.

वास्तविक, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने मुळशी धरणातून पाणी आरक्षणाबाबत मागणी केली आहे. या संदर्भात काही दिवसांपूर्वी पुण्यात कालवा समितीची बैठक झाली. मात्र, या बैठकीला 'पीसीएमसी' च्या अधिकाऱ्यांना निमंत्रित केले नाही.

दरम्यान, भारतीय जनता पार्टीचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी ही बाब राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. दि. 4 मार्च 2025 रोजी विखे-पाटील यांची भेट घेतली. तसेच, मुळशी धरणातून पाणी आरक्षण निश्चित करताना पुण्यासोबत पिंपरी-चिंचवडच्या प्रस्तावाचाही सकारात्मक विचार करावा, अशी आग्रही मागणी केली होती.



यावर, संबंधित विभागाची उच्चाधिकार बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन विखे-पाटील यांनी दिले होते. त्यानंतर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या निर्देशानुसार, चार दिवसांपूर्वी बैठक नियोजित केली होती. मात्र, ही बैठक झाली नाही. त्यामुळे पुन्हा दि. 10 मार्च रोजी ही बैठक नियोजित केली होती. या बैठकीला भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे, चिंचवडचे आमदार शंकर जगताप, महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

> "मुंबईत राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या दालनामध्ये महापालिका, जलसंपदा विभागाचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या 2025-30 दरम्यान 35 लाखांच्या घरात असेल. पवना, आंद्रा- भामाआसखेड सोबतच नवीन जलस्त्रोत निर्मिती ही शहराची गरज आहे. त्या अनुशंगाने आम्ही पाठपुरावा करीत आहोत.
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा.**

### जलसंपदा मंत्र्यांचे निर्देश काय आहेत?

"कृषि सिंचनाला धक्का न लावता पुणे, पिंपरी-चिंचवडला पाणी आरक्षीत करण्यास हरकत नाही". मात्र, यासोबतच पाणी पुन:वापर किती होतो? लोकसंख्यानुसार पाण्याचा वापर किती आहे? पाणी गळती आणि चोरी रोखण्यासाठी मीटर बसवता येतील का? याबाबत विचार करावा. तसेच, चीफ वॉटर ऑडिटरच्या माध्यमातून 'वॉटर ऑडिट' करावे. डाटा व्हेरिफाय करावा. धरणाचा गाळ व इतर मेंटनन्सची कामे मार्गी लावावीत, असे आदेश विखे-पाटील यांनी दिले आहेत.

# पुणेकरांसाठी मेट्रोचे नवे मार्ग सुरु होणार

## अर्थसंकल्पात 9 हजार 897 कोटींचा प्रस्ताव : अर्थमंत्री अजित पवारांची घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांच्या मेट्रोसाठी राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात ९८९७ कोटी रूपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला असून, खडकवासला स्वारगेट हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप वारजे माणिकबाग या दोन मार्गिकांसाठी हा प्रस्ताव देण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील सर्वच पुणेकरांना या मार्गिकांचा लाभ मिळणार आहे.

राज्याचा अकरावा अर्थसंकल्प सोमवारी (दि.१०) सादर झाला. त्यामध्ये अर्थमंत्री अजित पवार यांनी ही घोषणा केली. अर्थमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील दुसऱ्या टप्प्यातील मेट्रोच्या कामांची माहिती दिली. पहिल्या टप्प्यामध्ये पुण्यातील मध्यवर्ती भागात मेट्रोचे जाळे पसरलेले आहे. मात्र, पुण्याच्या आजुबाजूला देखील मेट्रोचे जाळे पसरविण्यात येणार आहे. त्यासाठी नवीन मार्गिका होणार आहेत. पुण्यात एकूण २३ किलोमीटरचा मार्ग खुला होणार आहे. सध्या दररोज दीड लाख पुणेकर मेट्रोने प्रवास करत आहेत. नवीन मार्ग सुरू झाल्यास या संख्येत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.



पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका आणि या प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे, पुणे मेट्रो टप्पा दोन अंतर्गत खडकवासला, स्वारगेट हडपसर खराडी आणि नळ स्टॉप- वारजे माणिकबाग या दोन मार्गीकांच्या 9897 कोटी रुपयांच्या प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठवलेला आहे.

**नव्या मार्गिका सुरू होणार !**

पुण्यात मेट्रोच्या काही मार्गिकांचे काम चालू आहे. येत्या काळात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणखी मजबूत करण्यासाठी सरकार काही नव्या मेट्रो मार्गिकांचं बांधकाम सुरू करणार आहे. अनेक मेट्रो मार्गिका प्रस्तावित असून, त्यापैकी काही मार्गिकांना मंजुरी दिली आहे. या मार्गिकांच्या कामांना आता सुरुवात होणार आहे.

### पुणे मेट्रो दृष्टीक्षेपात

- मार्गांची संख्या : ०२
- एकूण स्थानके : ३०
- भूमिगत स्थानके : ०५
- कार्यरत स्थानके : २५
- नेटवर्क लांबी (किमी) : ३३.१

### सध्या सुरु असलेले मार्ग

१) वनाझ ते रामवाडी
२) स्वारगेट ते पीसीएमसी

# वाहनमुक्त दिन उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत

## पिंपरी मार्केटमधील रस्ता कायमस्वरुपी पादचारी मार्ग करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी मार्केट येथे महानगरपालिकेच्या वतीने वाहन-मुक्त दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पिंपरी मार्केटमधील संपूर्ण रस्ते दोन दिवस सकाळी आठ ते रात्री नऊ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले होते. यानिमित्ताने आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी उत्स्फुर्तपणे प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. त्यामधील ‘चाय पे चर्चा’ या कार्यक्रमाच्या समारोप सत्रामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी वाहतूक पोलिस निरीक्षक वर्षाराणी पाटील, प्रतिनिधी डब्बू आसवानी, मराठी अभिनेते अभिज्ञा भावे, दुकानदार संघटनेचे प्रतिनिधी नीरज चावला, पुरुषोत्तम बोधवानी तसेच शहरविकास तज्ज्ञ प्रसन्न देसाई, आशिक जैन यांच्यासह स्थानिक दुकानदार व नागरिकांशी चर्चा केली.

यामध्ये दुकानदार संघटनांनी महापालिकेच्या वतीने ३० आणि ३१ मार्च रोजी पुन्हा वाहन-मुक्त उपक्रम राबविण्यात यावा, बाजारपेठांचा मार्ग कायमस्वरुपी पादचारीमार्ग व्हावा, अशी विनंती आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली. यावर आयुक्त शेखर सिंह यांनी लवकरच योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील असे आश्वासन दिले.

चाय पे चर्चा कार्यक्रमात बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, ‘वाहन-मुक्त दिन उपक्रमासारखे उपक्रम यशस्वी होण्यासाठी समाजातील नागरिकांचा सकारात्मक पाठिंबा महत्वाचा असतो. दिल्ली येथील चांदणी चौकातील पादचाऱ्यांच्या परिवर्तनातून तुम्ही पाहिलेले चित्र येथे वास्तवात उतरू शकते. तथापि, चांगले बदल होण्यासाठी वेळ लागतो आणि त्यासाठी मजबूत समुदायाचा पाठिंबा आवश्यक असून विचारविनिमय करून यावर मार्ग काढण्यात येईल, असे सांगितले.



वाहन-मुक्त उपक्रमादरम्यान पिंपरी मार्केटमध्ये नवीन ग्राहकांमध्ये २० टक्के वाढ झाली असून वाहनमुक्त वीकेंडमुळे व्यवसायात लक्षणीय वाढ झाली आहे. त्याचबरोबर ध्वनी, वायू प्रदूषण आणि वाहतूक कोंडी दूर झाल्यानंतर नागरिक सहजरित्या बाजाराकडे आकर्षित होतात. दुकानदार संघटनेने सुरुवातीला उपक्रमाबाबत शंका व्यक्त केली. परंतु वाहन मुक्त उपक्रमाच्या यशानंतर या उपक्रमामध्ये क्षमता असल्याचे जाणवत आहे. आमची कुटुंबे पिढ्यानपिढ्या या व्यवसायात आहेत, परंतु वाढती वाहतूक कोंडी पुढील पिढीला पुढे जाण्यापासून परावृत्त करत आहे. वाहन-मुक्त दिन यांसारखे उपक्रम पादचाऱ्यांसाठी अनुकूल बाजारपेठ खरेदीला अधिक आनंददायी अनुभव बनवू शकतात आणि यामुळे व्यवसाय देखील भरभराटीला येऊ शकतो, असे नागरिक प्रतिनिधी डब्बू आसवानी यांनी सांगितले.

अभिनेत्री अभिज्ञा भावे यांनी रस्ता सुरक्षिततेचे फायदे अधोरेखित केले. ‘जागतिक शहरांमधील बाजारपेठा आकर्षक आहेत. त्या आपल्याला मुक्तपणे चालण्याची आणि खरेदी करण्याची संधी देतात. पिंपरी चिंचवड या दिशेने पावले उचलत असेल, तर आपण त्याचे समर्थन केले पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

शहरविकास तज्ज्ञ आशिक जैन यांनी चाचणीमध्ये वापरल्या जाणाऱ्या डिझाईन्स सादर करुन सुरू असलेल्या प्रभावी मूल्यांकन अभ्यासाची रुपरेषा सादर केली. यामध्ये शहरी गतिशीलता आणि प्रकल्प विभागाच्या देखरेखीखाली येणाऱ्या प्रवाशांची संख्या आणि भागधारकांच्या अभिप्रायावरील माहिती तसेच महानगरपालिकेच्या पुढील महत्वाकांक्षी उपक्रमांची माहिती दिली.

आयटीडीपी इंडियाचे प्रांजल कुलकर्णी म्हणाले, ‘जेव्हा बाजारपेठा वाहनांना नव्हे तर लोकांना सेवा देतात, तेव्हा बाजारपेठा भरभराटीला येतात. या उपक्रमानंतर सुरुवातीच्या निरीक्षणांमध्ये हवा आणि ध्वनी प्रदूषणामध्ये लक्षणीय घट दिसून आली असून त्याच्या तपशीलवार परिणामांची माहिती लवकरच समोर येईल.

### वाहतुक पोलिसांचे उत्तम नियोजन!

**वाहन-मुक्त उपक्रम यशस्वी होण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिका व वाहतूक पोलिसांच्या पथकांनी वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी, दुकानदारांना सहभागी करून घेण्यासाठी दोन आठवड्यांहून अधिक काळ तयारी सुरू होती. वाहनांसाठी पार्किंगसाठी चार मोफत जागा ठरविण्यात आल्या आणि सुरळीत वाहतुकीसाठी अतिरिक्त कर्मचारी तैनात करण्यात आले. पोलीस निरीक्षक वर्षाराणी पाटील यांनी याबाबत माहिती दिली.**

# रानजाई महोत्सवाचे उत्कृष्ट नियोजन; आमदार उमा खापरे

## महापालिकेच्या वतीने आयोजित महोत्सवाचा समारोप : विविध स्पर्धा प्रकारातील पारितोषिकांचे वितरण



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेने 'रानजाई महोत्सव' चे उत्कृष्ट आयोजन केले आहे. शहरातील नागरिकांनी या महोत्सवात फळे, फुले, भाजीपाला स्पर्धेमध्ये भाग घेऊन पर्यावरणाप्रती आपले योगदान दिले आहे ही कौतुकास्पद बाब आहे, असे सांगून त्यांनी दुर्गादेवी टेकडीवर पूर्वी एकही झाड नव्हते, तेव्हा महानगरपालिकेच्या वतीने संपूर्ण दुर्गादेवी टेकडीवर विविध प्रजातींच्या झाडांच्या बिया पेरण्यात आल्या, त्यामुळे आज दुर्गा टेकडी हिरवेगार वनराईचे क्षेत्र बनले असून ही टेकडी पर्यटकांसाठी एक आकर्षण ठरली आहे. तसेच सध्या महापालिकेला कोणत्याही उपक्रमांचे चांगले नियोजन आणि आयोजन करणारा अधिकारी वर्ग लाभला आहे. शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रमामध्ये नुकताच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला राज्यातील प्रथम क्रमांकाचे बक्षीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मिळाला, ही अभिमानास्पद गोष्ट आहे, असे प्रतिपादन आमदार उमा खापरे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाच्या वतीने 'रानजाई महोत्सव' या २८ वे भव्य 'फळ-फुले भाजीपाला प्रदर्शनाचे व स्पर्धेचे आयोजन नियोजित महापौर निवास निगडी प्राधिकरण येथील मोकळ्या मैदानात ७ ते ९ मार्च २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. या तीन दिवसीय महोत्सवाची सांगता काल विधान परिषद आमदार उमा खापरे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते झाली, यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार उमा खापरे या बोलत होत्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, उद्यान अधिक्षक योगेश वाळुंज, राजेश वसावे तसेच वृक्षप्राधिकरण समितीचे माजी सदस्य हिरामण भुजबळ, सुरेश वाडकर, संभाजी बारणे आणि महापालिका कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'शहराच्या हरीत संवर्धनासाठी तसेच शहरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी राजमाता जिजाऊ उद्यान सारख्या उद्यानांसोबतच थीम पार्क उद्यान बनविण्यावर भर देणार आहोत. दुर्गा देवी टेकडी वरील झाडांची संख्या वाढवण्याचा मानस आहे. त्यासाठी लवकरच नागरिकांकडून संकल्पना मागवल्या जाणार आहेत. शहरातील रस्ते दुभाजकामध्ये देखील चांगली झाडे लावली जात आहेत. शहरात सार्वजनिक ठिकाणी शक्य तेथे स्थानिक प्रजातीच्या झाडांची लागवड करण्यात येणार आहे. उद्यान विभागाने नव्याने समाविष्ट भागामध्ये उद्यानाची निर्मिती करावी, यासाठी देखील नियोजन सुरू आहे. पुढील वर्षी या महोत्सवाचे स्वरूप आणखी बदलणार असून शक्यतो हिवाळ्यात हा महोत्सव भरविण्याचे नियोजन करण्यात येईल, असे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले.

अभिनेत्री मृणाल कुलकर्णी म्हणाल्या, 'उद्यान प्रत्येक शहराचे हृदय असते. लहान मुलांना निसर्गाची गोडी लागावी, यासाठी महापालिकेने शालेय विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घ्यावे, व एक झाड लावण्यास द्यावे. हा प्रयोग नक्की यशस्वी होईल, असे वाटते. शक्य त्यांनी आपल्या घराच्या छतावर छोटेसे फुलबाग फुलवावी व शहराच्या हरित उपक्रमास साथ द्यावी. महापालिकेच्या उद्याना विभागाच्या वतीने सुयोग्य नियोजन करून या महोत्सवाचे आयोजन केले आहे.

यावेळी महोत्सवाच्या माध्यमातून टेरेस गार्डन, घरगुती रोपसंवर्धन आणि लँडस्केप डिझाइन या स्पर्धांमधील विजेत्यांना फिरती पारितोषिके व रोख रकमेची बक्षिसे देखील देण्यात आली. या बक्षीस विजेत्यांमध्ये १५१ प्रथम क्रमांकाची, द्वितीय क्रमांकाची १४३ तर तृतीय क्रमांकाची १२१ अशा एकूण ४१५ बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धन आणि वृक्षारोपणाची जाणीव निर्माण व्हावी, शहरात पर्यावरणाचा समतोल राखला जावा, या हेतूने महापालिकेच्या वतीने २८ वर्षांपासून रानजाई महोत्सवाचे आयोजन केले जाते. निसर्गसौंदर्याने नटलेली फुलांची आकर्षक सजावट, कलात्मक आकृती मांडणी आणि हरित वातावरणाचा समृद्ध अनुभव रानजाई महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांना मिळत असतो.

# सोसायटीधारक ठरवणार, आवारात लिकर शॉप हवे की नको!

## आमदार महेश लांडगे यांची विधानसभेत लक्षवेधी : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सकारात्मक प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

गृहनिर्माण सोसायटी, शाळा, धार्मिक स्थळे, हॉस्पिटल यासह रविवाशी क्षेत्रात वाईन शॉप, बीअर शॉप, बार आणि रेस्टॉरंट परवानगी देताना सोसायटीची 'एनओसी' बंधनकारक करण्यात येणार आहे. त्यासाठी नियमांमध्ये सुधारणा करण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

महाराष्ट्र अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी सोसायटींच्या आवारामध्ये लिकर शॉपला परवानगी दिल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत लक्षवेधी सूचना मांडली. त्यावर सभागृहात चर्चा झाली.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमध्ये विविध गृहप्रकल्प आहेत. त्यामधील कमर्शिअल दुकानांमध्ये लिकर शॉपचे परवाने दिले जातात. सोसायटींच्या आवारामध्ये लिकर शॉप असल्यामुळे विद्यार्थी, माता-भगिनी, ज्येष्ठ नागरिक यांना त्रास होत आहे, अशा नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमानुसार, तक्रारी दिल्यानंतर दुकान बंद करण्यात येईल, असे म्हटले आहे.

मात्र, पिंपरी-चिंचवडमध्ये अनेक सोसायटींच्या आवारात देशी दारु दुकान, वाईन शॉप, बीअर बार यांना परवाने दिले आहेत. अशा ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी नागरिक दारु पिण्यासाठी बसतात. अशा परवानाधारकांवर कारवाई करावी.



आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, मद्य विक्री दुकानाबाबत जीआर काढताना संबंधित अधिकाऱ्याने 'नापिक डोक्यातून सुपिक विचार' आला आहे. लोकांची कितीही इच्छा असली, तरी दारु दुकान बंद करता येत नाही. एकूण मतदानापैकी 50 टक्के मतदान घेण्याचा नियम बदलून झालेल्या मतदानापैकी 75 टक्के मतदान 'आडवी बाटली' साठी झाले, तर दुकान बंद करण्याचा निर्णय घ्यावा. सामाजिक स्वास्थ याचा विचार करुन 'जीआर'मध्ये बदल केला पाहिजे. पंतप्रधान आवास योजनेच्या आवारात बीअर बार उघडले जात आहेत. तक्रार करुन कारवाई केली जात नाही. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था दारुड्याच्या बॉटलवर उभी राहता कामा नये. याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक उत्तर दिले.

### गृहनिर्माण सोसायटी नियमातही सुधारणा..

**» उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, 1972 पासून नवीन लिकर परवाने दिलेले नाहीत. काही भागातील दुकानांना स्थलांतरीत करण्याचे प्रस्ताव येतात. त्याचे तपासणी होते. नगरपालिकेचा ना हरकत दाखला, ग्रामीण भागात ग्रामसभेचा ठराव घेतला जातो. महानगरपालिका परिसरात नवीन सोसायट्यांच्या आवारात गाळे काढले जातात. त्या ठिकाणी मद्य दुकाने स्थलांतरीत करण्याबाबत नियमात तरतूद नाही. सोसायटींच्या गाळ्यामध्ये कोणती दुकाने असावीत, यासाठी नियमात सुधारणा करण्यात येतील. तसेच, लिकर दुकानाचे परवाने देताना सोसायटीधारकांची 'एनओसी' घेतली जाईल. त्यासाठी नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री पवार यांनी केली.**

# वाहतूक कोंडीमुळे नागरिकांची दमछाक!

## हडपसर परिसरातील मगरपट्टा चौकातील चित्र : समस्या सोडविण्यासाठी उपाययोजनांची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

येथील मगरपट्टा चौकात सकाळी आणि संध्याकाळी सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याने वाहनचालक आणि नागरिकांची गैरसोय होत आहे. पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणेदेखील कठीण होत आहे. या ठिकाणी चार वाहतूक पोलिसांची आवश्यकता असताना केवळ एकच पोलिस वाहतुकीचे नियमन करताना दिसून येत आहे. तसेच सायंकाळच्या वेळेला या ठिकाणी पोलिस नसल्याने वाहतूक कोंडीत भर पडत असल्याचे परिसरातील नागरिकांनी सांगितले.

मगरपट्टा चौकात नेहमीच वाहने आणि नागरिकांची वर्दळ असते. पुणे, हडपसर आणि नगर मार्गे येणारी वाहने या चौकामधून ये-जा करतात. मात्र या ठिकाणी अनेक वेळा सिग्नल बंद असतात. वाहतूक पोलिस वेळेवर येत नाहीत, त्यामुळे चौकात सातत्याने नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. वाहनांच्या गर्दीतून मार्ग काढताना पादचाऱ्यांची दमछाक होत आहे.

परिसरामध्ये महापालिकेचे राम मनोहर लोहिया उद्यान, खासगी हॉस्पिटल आहेत. यामुळे लहान मुले आणि नागरिकांना वाहतूक कोंडीचा अडथळा पार करीत जीव धोक्यात घालून उद्यानात जावे लागत आहे. तसेच हॉस्पिटलमध्ये येणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत आहे. परिसरात चंद्र मौलेश्वर महादेव मंदिर व श्री संत सावतामाळी मंदिर असल्याने भाविक या ठिकाणी दर्शनासाठी येतात. मात्र अनेक वेळा भाविक अपघात जखमी झाल्याची उदाहरणे आहेत.



वाहनांची संख्या पाहता मगरपट्टा चौकात दररोज चार वाहतूक पोलिस असणे गरजेचे आहे. मात्र या ठिकाणी केवळ एक पोलिस कर्मचारी असल्याचे चित्र दिसून येत आहे. सायंकाळच्या वेळेस तर या ठिकाणी वाहतूक पोलिस नसतात. पूर्व आणि पश्चिम दिशेकडून या चौकातून उलट्या दिशेने येणा-या पादचाऱ्यांसाठी धोका ठरत आहे. यामुळे चौकातील वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी पुरेशे पोलिसांची नियुक्ती करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

मगरपट्टा चौकात पूनावाला ग्रुपचे सहाय्यक वार्डन आहेत. वाहतूक पोलिसांच्या मदतीसाठी हे वार्डन काम करतात, तरीही या भागातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटू शकला नाही. या चौकातून ये-जा करण्यासाठी नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. यामुळे चौकातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जुन्नर तालुक्यात कांदा काढणीला वेग

## कांद्याचे बाजार पडल्याने कांदा काढून साठवून ठेवण्याशिवाय सध्या शेतकऱ्यांपुढे पर्याय नाही

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यात उन्हाळी कांदा काढणी चालू झाली आहे. मजुरांचा तुटवडा भासू लागला आहे. मजूर उपलब्ध होत नसल्याने माळशेज घाटाखालून मजूर आणावे लागत आहेत. एका मजुराला साडेपाचशे ते सहाशे रुपये रोज द्यावा लागत आहे. कांद्याचे बाजार पडल्याने कांदा काढून साठवून ठेवण्याशिवाय सध्या शेतकऱ्यांपुढे पर्याय राहिलेला नाही.



यंदा जुन्नर तालुक्यात दोन हजार हेक्टरवर कांद्याची लागवड करण्यात आली. साडेतीन-चार महिन्यांत कांदा काढणीला येतो. सध्या बनकरफाटा, ओतूर, अहीनवेवाडी, डिंगोरे, उदापूर, खामुंडी, उंब्रज या भागांमध्ये शेतकऱ्यांची कांदा काढण्याची लगबग सुरू आहे. मजुरांचा तुटवडा जाणवत असल्याने जादा मजुरी देऊन मजूर आणावे लागत आहेत.

स्थानिक मजूर उपलब्ध होत नसल्याने माळशेज घाटाच्या खालून मजूर बनकर फाट्यावर येत आहेत. कांदा काढण्यासाठी जो शेतकरी जास्त जास्त रोज देईल त्याकडे मजूर जात आहेत. यंदाच्या वर्षी कांद्याला पोषक वातावरण राहिल्याने कांद्याचे उत्पादनदेखील चांगले झाले आहे.

कांद्याच्या उत्पादनात जरी वाढ होत असली तरी बाजारभाव गडगडल्यामुळे शेतकऱ्याचे "अर्थकारण" कोलमडण्याची शक्यता आहे. सध्या चांगल्या गावठी कांद्याला दहा ते पंधरा रुपये किलो असा भाव मिळत आहे. आठवडाभरापूर्वी कांद्याला 20 ते 25 रुपये किलो भाव होता. मात्र आता भाव कमी झाल्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

### उच्चशिक्षित मजूर

» कांदा उत्पादकांना मजुरांना साडेपाचशे ते सहाशे रुपये द्यावे लागत आहेत. मजुरांना जाण्या- येण्यासाठी 80 रुपये खर्च येतो. फांगुळगव्हाण येथील गुलाबताई मेंगाळ या महिलेचे शिक्षण एम. कॉम पर्यंत झाले असूनही त्या कुटुंबातील इतरांना रोजगाराचे साधन नसल्यामुळे कांदा काढणीसाठी येत आहेत. याशिवाय दुसरा पर्याय नसल्याचे त्यांनी सांगितले.